सत्यमेव जयते

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

ANNUAL REPORT

वार्षिक अहवाल

YEAR 2022—2023

सन २०२२-२०२३

THIRTIETH YEAR

तिसावे वर्ष

Office

कार्यालय

Gruhnirman Bhavan, Mezzanine Floor, Bandra (East), Mumbai 400 051.

गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वार्षिक अहवाल

सन २०२२-२०२३

तिसावे वर्ष

कार्यालय
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

आरजी ४३५–१

अनुक्रमाणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
१.	महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य मंडळ २०२२-२३	५
२.	प्रस्तावना, आयोगाची रचना, आयोगाची कार्य	५
३.	आयोगाचे अधिकार, आर्थिक तरतुद, आयोगाच्या बैठका	६
४.	सन २०२२-२०२३ या वर्षातील आयोगामार्फतचा कार्यक्रमांचा तपशील	७ ते ९
५.	महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन व विधी शाखेतील वर्षनिहाय प्रकरणाचा तपशील.	९
६.	लेखा परीक्षण अहवाल	११ ते ३८

INDEX

Sr. No.	Details	Page No.
1.	Board of Members	41
2.	Introduction, Constitution of the Commission, Functions of the Commission, Powers of Commission	42
3.	Financial Provision	43
4.	Meetings of the Commission	43
5.	Particulars of programs organized by Commission	43 to 46
6.	Yearwise details of matters in counselling and Legal Department in office of Maharashtra State Commission of Women	46
7.	Acknowledgement	47
8.	Internal audit and AG Audit	48 to 73

महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य मंडळ - २०२२ - २०२३

अ.क्र.	नाव	पद	कार्यकाल
१	श्रीमती रुपाली चाकणकर	अध्यक्षा	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
२	ॲड. श्रीमती गौरी नारायणदास छाब्रिया	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
३	ॲड. श्रीमती संगीता चव्हाण	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
४	कु. सुप्रदा फातर्पेकर	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
५	श्रीमती दीपिका संजय चव्हाण	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
६	श्रीमती आभा विजयकुमार पांडे	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
७	श्रीमती उत्कर्षा रुपवते	सदस्या	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
८	श्री. रजनीश सेठ , भा. पो. से. पोलीस महासंचालक	पदसिद्ध सदस्य	१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३
९	श्रीमती अनिता पाटील (भा.व.से.)	सदस्य-सचिव (पूर्ण वेळ)	१.४.२०२२ ते २१.४.२०२२
१०	श्रीमती श्रद्धा जोशी (भा.रा.से.)	सदस्य-सचिव (अ.का.)	२१.४.२०२२ ते ३१.०३.२०२३

वार्षिक अहवाल २०२२ - २०२३

१. प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन २०२२ - २०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. स्वातंत्र्योत्तर राष्ट्राच्या विकासात समाजातील सर्व स्तराचा सहभाग असावा यासाठी, संविधानाच्या शिल्पकारांनी समाजातील सर्व थरातील लोकांसाठी संविधानात विविध तरतुदी केल्या आहेत. महिलांच्या दर्जाचे रक्षण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि १६ द्वारे हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या आणि विशेषतः समाजातील महिलांचा दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्यासाठी संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९-क आणि ४२ मध्ये स्थापित केलेल्या तत्त्वांना साकारण्याच्या ध्येयाने महाराष्ट्र शासनाने १९९३ यावर्षी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली. संविधानाने महिलांना दिलेल्या अधिकारांविषयी महिलांमध्ये जागृती घडवून आणण्यात आयोग नेहमीच अग्रेसर राहिला आहे. या प्रयत्नात आयोगाने शासनाची व इतर स्वयंसेवी संघटनांची मदत घेऊन हे कार्य सुरू ठेवले आहे.

२. आयोगाची रचना :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ याचे कलम ३(२) नुसार आयोगामध्ये महिलांच्या कार्याला वाहून घेतलेली एक स्त्री अध्यक्ष म्हणून तसेच सहा मानद सदस्यांचा अंतर्भाव असेल अशी तरतूद आहे. त्यापैकी अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून किमान एक सदस्य असेल. पोलीस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतील तर राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या अखिल भारतीय सेवेच्या महिला अधिकारी आयोगाच्या सदस्य-सचिव असतील.

३. आयोगाची कार्ये :

महिलांना संरक्षण देण्यासाठी आणि महिलांशी संबंधित अधिनियम यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचवणे तसेच विधीविधानाच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत, शासनाला अहवाल सादर करणे, महिलांचे संरक्षण करणाऱ्या अधिनियमांच्या उल्लंघनाबाबतीत समुचित न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल करणे. न्यायालय, लोक न्यायालय व न्यायालयीन गुप्त चौकशीस उपस्थित राहणे व आयोगाची मते मांडणे. गरीब पीडित महिलांवर झालेल्या अन्यायविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यासाठी अशा गरीब पीडित महिलांना मोफत कायदेशीर सल्ला

व मार्गदर्शन देणे, महिलांवरील अन्याय, हुंडाबळी, लैंगिक छळवणूक, इत्यादी प्रकरणात चौकशी करणे, पोलीस कारवाईचा पाठपुरावा करणे व आवश्यक असल्यास त्या प्रकरणात अन्वेषण करणे. महिलांच्या सामाजिक - आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेत सहभागी होणे, त्यात मतदान करणे व सल्ला देणे.महिलांचा सर्वांगीण विकास, तंत्रज्ञान, व्यवसायातून होणारे रोग, शैक्षणिक सुविधांचा अभाव, समान व किमान वेतन, कुटुंबाकडून होणारी छळवणूक, कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक छळवणूक, इत्यादींचा अभ्यास करणे आणि महिलांसाठी धोरण तयार करण्याबाबत शासनाला सूचना करणे. सुधारगृहे, तुरुंग व महिलांच्या संस्थांची पाहणी करणे व अशा पाहण्यातून दिसून आलेल्या त्रुटींसाठी सुधारात्मक कार्यवाही सुचवणे.

४. आयोगाचे अधिकार :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ यांच्या कलम १२ (२) अन्वये आयोगाला पुढील अधिकार देण्यात आले आहेत -

महिलांच्या सर्वांगीण विकासाची परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सरकारने महिलांकरता आयोगाला संविधानिक दर्जा व स्वायत्तता दिली आहे. पुढील बाबतीत आयोगाला दिवाणी न्यायालयात प्रयोज्य होतील असे अधिकार देण्यात आले आहेत, त्या बाबी अशा कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची मागणी करणे. साक्षीदारांची व दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आदेश काढणे जर कोणत्याही प्रकरणात चौकशी करणे आवश्यक असेल तर संबंधित व्यक्तीला आपल्यापुढे साक्ष देण्यासाठी उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचे अधिकार आयोगाला आहेत. कोणत्याही कार्यालयांमधून कोणतीही कागदपत्रे मागवण्याचे अधिकार, महिलांबाबतीत कोणत्याही प्रश्नांची तपशिलावर चौकशी करण्यासाठी राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करणे असे अधिकार आयोगाला आहेत.

५. आर्थिक तरतूद

राज्य शासनाकडून आर्थिक वर्ष सन २०२२-२३ साठी रु. ५२८.३३ लाख प्राप्त झाले आहेत, त्यापैकी वेतनाकरिता रु. ३०५.५६ लक्ष व वेतनेतर बाबीकरिता रु. २२२.७७ लक्ष प्राप्त झाले आहे. या तरतुदीतून आयोग कर्मचारी वेतन, सदस्यांचे मानधन, प्रवास भत्ते, वाहन, आयोगाने आयोजित केलेल्या बैठका, कार्यशाळा व चर्चासत्र, प्रशिक्षण कार्यक्रम व आयोगाच्या इतर उपक्रमांवर हा खर्च करण्यात आला आहे. लेखापरीक्षक व महालेखाकार यांचा अंतर्गत लेखापरीक्षा अहवाल जोडपत्र 'अ' नुसार सादर केले.

६. आयोगाच्या बैठका -

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य मंडळाच्या सन २०२२-२३ या वर्षातील झालेल्या बैठकांचा तपशील (इतिवृत्त नोंदवही नुसार)

अ.क्र.	बैठकीचा तपशील	संख्या
१	१३.०१.२०२३	१

७. सन २०२२ -२०२३ या वर्षातील आयोगामार्फत घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा तपशील

(१) आयोगाच्या कायद्यानुसार नागपूर मध्यवर्ती कारागृह जिल्हा महिला कारागृह नागपूर येथे भेट दिली.

दिनांक १२.०४.२०२२ रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह जिल्हा महिला कारागृह, नागपूर येथे आयोगाच्या माननीय सदस्य श्रीमती आभा पांडे यांनी भेट दिली. सदर कारागृह भेट व तपासणीदरम्यान मा.सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी कारागृह अधीक्षक, तेथील अधिकारी कर्मचारी, सेवाभावी संस्था यांच्या समवेत महिला बंदीशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यांचे मनोबल वाढवण्याचा आणि त्यांना आधार देण्याचा प्रयत्न केला. तसेच कारागृहातील महिला बंदींना देण्यात येणाऱ्या अन्नपदार्थ जीवन सर्वपोषकतत्त्वयुक्त व समतोल आहेत की नाही याबाबत पाहणी व तपासणी केली गेली.

(२) आरोग्य वारी :-

महाराष्ट्र राज्याला वारकरी संप्रदायामुळे समृद्ध, सांस्कृतिक वारसा लाभला आहे. संतांनी आपल्या जनजागृती कार्याच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात आध्यात्मिक लोकशाही स्थापन केली आहे. वारी ही महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक परंपरा आहे. धर्म,जाती, पंथ, लिंग या पलीकडे जाऊन सर्व समावेशक समाजामध्ये तयार करण्याचे कार्य संतांनी केले आहे. आषाढी व कार्तिकी वारीच्या निमित्ताने वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दाखल होत असतात, या वारकऱ्यांमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय असते. आषाढी वारी मधील महिलांची सुरक्षितता व आरोग्य केंद्रस्थानी ठेवून आरोग्यवारीचा शुभारंभ दिनांक १९.०६.२०२२ रोजी जिल्हा पुणे येथे पार

पडला. महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत दिनांक २४ व २५ जून २०२२ पर्यंत आषाढी एकादशी निमित्त आरोग्य वारीच्या अनुषंगाने मा. अध्यक्षा यांनी महिलांच्या सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टीने मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असले बाबत सदर व्यवस्थेची पाहणी केली.

(३) अंतर्गत तक्रार निवारण समिती सक्षमीकरणाबाबत आयोजित आढावा बैठक (स्थळ : महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय)

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार मा. अध्यक्षा यांनी दिनांक ४/८/२०२२ रोजी दुपारी २:३० वाजता राज्य महिला आयोग कार्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती (ICC) सक्षमीकरणाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर आढावा बैठकीसाठी मा. कामगार आयुक्त, मुंबई, सचिव, उद्योग संचालनालय, मुंबई, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई, रजिस्टर ऑफिस कंपनीचे प्रतिनिधी, मुंबई आणि श्रीमती अनघा सरपोतदार, (POSH तज्ञ साधन) उपस्थित होते.

(४) अंतर्गत तक्रार निवारण समिती सक्षमीकरणाबाबत आयोजित आढावा बैठक (स्थळ : महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय)

महिलांविषयक प्रश्न अधिक सक्षमपणे हाताळण्याकरिता महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावेत, याकरिता दिनांक ५ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता मा. अध्यक्षा यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये महिलांचे प्रश्न अधिक सक्षमपणे हाताळण्यासंदर्भात तसेच पीडित महिलांना पोलिसांकडून मदत व सहकार्य मिळण्याच्या दृष्टीने आयोग व पोलीस यंत्रणा यांचा समन्वय अधिक सक्षम होण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

(५) मानवी तस्करीतील तंत्रज्ञानाचा वापर आणि गैरवापर या विषयावर परिसंवाद (स्थळ- सह्याद्री राज्य अतिथिगृह) :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व TCTG (The Counter Trafficking Group) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी सह्याद्री राज्य अतिथी गृह, मुंबई येथे "मानवी तस्करीतील तंत्रज्ञानाचा वापर आणि गैरवापर (Use and Abuse of Technology in Human Trafficking)" या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सदर परिसंवादासाठी मा.अध्यक्षा राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली, श्री विरेंद्र मिश्रा, ए.आय.जी/ एस. आय.एस.एफ, भोपाळ, म. प्र., श्री. दीपक पांडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, मुंबई प्रतिनिधी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास मा. अध्यक्षा,मा.सदस्या, सदस्य सचिव उपस्थित होते.

(६) जिल्हा रायगड येथे पोषण पंचायत या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला :-

सन २०१८ पासून सप्टेंबर महिन्यात सर्व भागधारकांसोबत एकत्रितपणे राष्ट्रीय पोषण दिन म्हणून साजरा केला जातो. भारत देश कुपोषण मुक्त करण्याचा माननीय पंतप्रधान यांचा दृष्टिकोन आहे. पोषण दिन साजरा करण्यासाठी संपूर्ण महिनाभर देशभरात पोषण आहाराविषयी उपक्रम राबविले जातात. महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत जिल्हा रायगड येथे दिनांक १६/०९/२०२२ रोजी जन सुनावणी दरम्यान "पोषण पंचायत" या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

(७) Opening of Legal Aid clinic चे उद्घाटन कार्यक्रम :-

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने लीगल एड क्लिनिक उद्घाटन कार्यक्रम सह्याद्री राज्य अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे दिनांक १८/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आला. सदर Legal Aid Clinic चे उद्घाटन मा. श्री मंगल प्रभात लोढा, मा. मंत्री, महिला व बालविकास व श्रीमती रेखा शर्मा, मा.अध्यक्षा राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या हस्ते डिजिटल स्वरूपात करण्यात आले. राज्य महिला आयोग कार्यालयात पीडित महिलांना कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन तात्काळ मिळावे, याकरिता महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात Legal Aid Clinic दिनांक १८/ ११/२०२२ पासून सुरू करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा.ना. श्रीमती नीलम गोऱ्हे, महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती, मा. श्रीमती स्वाती चौहान मॅडम, मा. अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई उपनगर, मा. श्री. दिनेश सुराणा, सदस्य-सचिव, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण आयोगाच्या माननीय अध्यक्षा रूपाली चाकणकर, मा.सदस्या, ॲड. गौरी छाब्रिया, ॲड. संगीता चव्हाण, मा. सदस्य सचिव, श्रीमती श्रद्धा जोशी आणि आयोगातील अधिकारी व कर्मचारी अशी एकूण ११५ जणांची उपस्थिती होती.

(८) Anti Human Trafficking या विषयावर परिसंवाद

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई आणि महाराष्ट्र पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६/१२/२०२२ रोजी पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई येथे "Anti Human Trafficking" या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. सदर परिसंवादासाठी मा. अध्यक्षा, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली, श्री दीपक पांडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, मुंबई उपस्थित होते. सदर कार्यक्रमास मा.अध्यक्षा,राज्य महिला आयोग व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

(९) दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी क्रांतीज्योती श्रीमती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांसाठी Free Health Checkup चे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि Lions International District ३२३१-A१ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांकरिता Free Health Checkup चे आयोजन आयोग कार्यालयातील सभागृहात दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमास डॉ. सागर मुंदडा, मानसोपचार तज्ञ यांनी "मेंटल हेल्थ" या विषयावर आणि डॉ. विकास गुप्ता कर्करोग तज्ञ यांनी "ब्रेस्ट कॅन्सर" या विषयावर माहिती दिली व योग्य काळजी घेण्याबाबतचे मार्गदर्शन केले. तसेच Eye check up, Osteoporosis, Blood Sugar व General Body checkup याकरिता डॉक्टर व कर्मचारी यांची व्यवस्था lions International district ३२३१-A१ या कार्यालयामार्फत करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी म्हाडा, माविम, विमा संचालनालय व स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

(१०) दिनांक १३.१.२०२३ रोजी महिलांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणावर आयोग कार्यालयात संवादात्मक चर्चासत्राचे आयोजन.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग व राष्ट्रीय मानव हक्क आयोग, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने **महिलांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणावर** संवादात्मक चर्चासत्राचे आयोजन आयोग कार्यालयात दिनांक १३.१.२०२३ रोजी करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्त्ये म्हणून श्री. ज्ञानेश्वर मुळये माजी सचिव परराष्ट्र मंत्रालय यांनी महिला हक्कांमधील गंभीर त्रुटी आणि उल्लंघने, मानवी हक्क मानकांच्या संदर्भात आणि लिंगभेदाच्या अनुषंगाने शाश्वत उपाय या विषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमांस आयोगाच्या मा. अध्यक्षा, श्रीमती रुपाली चाकणकर, सदस्या ॲड. गौरी छाब्रिया, ॲड. संगिता चव्हाण, श्रीमती उत्कर्षा रुपवते आणि आयोगातील अधिकारी / कर्मचारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, Law Students व म्हाडाचे अधिकारी / कर्मचारी अशी एकूण ६० जणांची उपस्थिती होती.

(११) महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाचा ३० वा वर्धापन दिन.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाचा ३० वा वर्धापन दिन सोहळा दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून राजकारण,समाजकारण आणि प्रशासन अशा क्षेत्रात महिलांसाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी मा.श्री दादाजी भुसे मंत्री, बंदरे आणि खनिकर्म प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच आयोगाच्या अध्यक्षा, श्रीमती रूपाली चाकणकर व आयोगाच्या सदस्य सचिव, श्रीमती श्रद्धा जोशी आणि आयोगातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(१२) जनसुनावणी विविध जिल्हे :-

महाराष्ट्र राज्यातील अनेक महिलांना मुंबई येथे पोहोचणे शक्य होत नाही. महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत स्थानिक स्तरावर आपले म्हणणे मांडण्याकरिता "महिला आयोग आपल्या दारी" या उपक्रमाद्वारे खालील जिल्ह्यात जनसुनावणी घेण्यात आलेली आहेः-

		केसेस
औरंगाबाद -	दि. २६/४/२०२२	५८
पालघर -	दि. ११/५/२०२२	८२
पुणे -	दि. १९/७/२०२२	९१
पुणे शहर-	दि. २०/७/२०२२	८८
पिंपरी चिंचवड-	दि. २१/७/२०२२	१०२
रायगड -	दि. १६/९/२०२२	७६
सोलापूर -	दि. २९/११/२०२२	८१
उस्मानाबाद -	दि. ३०/११/२०२२	६३
अहमदनगर -	दि. २८/२/२०२३	१५२

बीड -	दि. १/३/२०२३	५२
जालना -	दि. २/३/२०२३	११४
परभणी -	दि. ३/३/२०२३	१०९

(१३) जागतिक महिला दिन :-

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत जागतिक महिला दिन दिनांक ०८ मार्च २०२३ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, मुंबई येथे आयोजित करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजामध्ये आपले कार्य कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या आपल्या कार्यामुळे समाजामध्ये वेगळा ठसा उमटवणाऱ्या तसेच आपल्या कामामुळे इतर महिलांना प्रेरित करणाऱ्या अशा प्रतिभावंत महिलांना सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून खासदार मा.ना.श्री शरदचंद्रजी पवार उपस्थित होते. तसेच आयोगाच्या मा. अध्यक्षा श्रीमती रूपाली चाकणकर व आयोगाच्या मा. सदस्य सचिव, श्रीमती श्रद्धा जोशी आणि आयोगातील अधिकारी व कर्मचारी अशी एकूण ९०० जणांची उपस्थिती होती.

८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील समुपदेशन व विधी शाखेतील वर्षनिहाय प्रकरणांचा तपशील.

	(अ) एकूण मागील प्रलंबित तक्रारी	(ब) एकूण नोंद झालेल्या तक्रारी	(अ +ब) = एकूण तक्रारी	निकाली निघालेल्या तक्रारी
वैवाहिक समस्या	२३७४	२८१९	५१९३	२८४१
न्यायालयीन प्रलंबित दावा	००	००	००	००
हुंडाबळी	००	००	००	००
सामाजिक समस्या बलात्कार इत्यादी	१६५९	२८०३	४४६२	३०२०
मालमत्तेविषयी समस्या	३२३	९०९	१२३२	८८८
कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ	३३	३७	७०	२०
कामाच्या ठिकाणी होणारा छळ	४०२	५४८	९५०	५२५
इतर	१०७५	३०३०	४१०५	२८७८
	५८६६	१०१४६	१६०१२	१०१७२

प्रलंबित असलेल्या ५८४० तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

९. आभार :

महाराष्ट्र राज्य महिला आयोग गेल्या तीस वर्षांपासून कार्य करीत आहे. या कालावधीत अंमलात आणलेल्या सामाजिक कार्यक्रमांच्या बाबतीत आयोगाचे अधिकारी व कर्मचारी यांनी प्रामाणिकपणे आपले कार्य पार पाडले आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग आपल्या कर्मचारी वर्गाच्या मदतीने आणि शासनाने पुरविलेल्या निधीतून महिलांशी संबंधित शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्रयत्न करीत आहे. आढावा वर्षाच्या कालावधीत, राज्याचे माननीय मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील इतर मंत्री आणि वेगवेगळ्या विभागांचे सचिव यांनी आपले मौल्यवान सहकार्य व मार्गदर्शन देऊन आयोगाच्या कामकाजाला गती दिली आहे. त्याबद्दल राज्य महिला आयोग त्यांचा आभारी आहे.

सदस्य सचिव अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

दि.३१ मार्च, २०२३ या दिवशी असलेला ताळेबंद

(रक्कम रुपयात)

तपशील	सूची	३१.०३.२०२३ रोजी रु.	३१.०३.२०२२ रोजी रु.
१. निधीचा स्त्रोत			
अ) भांडवल निधी		-	-
ब) राखीव व अधिशेष	३	(१४,९४,१३,२७२)	(१०,६८,४९,८८७)
एकूण		**(१४,९४,१३,२७२)**	**(१०,६८,४९,८८७)**
२. निधीचा वापर			
स्थायी मालमत्ता	४	१,४९,३२,२४१	१,४९,३२,२४१
ढोबळ गट		१,१३,३५,२३७	१,०६,११,३७२
वजा : संचित घसारा		**३५,९७,००४**	**४३,२०,८६९**
३. चालू मालमत्ता, कर्जे व अग्रिम			
अ) हातातली रोकड व बँकेतील शिल्लक रक्कम	५	१०,८६,५३१	७,४२,९९८
ब) ठेवी	६	१,८४,७३०	१,३४,७३०
क) कर्जे व अग्रिमे	७	७२,२०,५४३	७८,६८,५५८
एकूण		**८४,९१,४०४**	**८७,४६,२८६**
वजा : चालू दायित्वे व तरतुदी			
अ) चालू दायित्वे	८	८४,६९,६२६	६०,५९,३७३
ब) तरतुदी	९	१५,३०,३२,०५४	११,३८,५७,६६९
एकूण		**१६,१५,०१,६८०**	**११,९९,१७,०४२**
निव्वळ चालू मालमत्ता		**(१५,३०,१०,२७६)**	**(११,११,७०,७५६)**
एकूण नियोजित निधी		**(१४,९४,१३,२७२)**	**(१०,६८,४९,८८७)**

वित्तीय विवरणाचा भाग असलेली महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिप्पण्यां १ ते १९

आमचे समदिनांकाचे अहवालानुसार

करिता आर. ओ. पांडे आणि असोसिएटस

सनदी लेखापाल

एफआरएन – १३४४५५-डब्ल्यू

सी.ए. आर.ओ. पांडे

प्रोप्रायटर

सभासदक्र. १४८४३९

ठिकाण : मुंबई

दिनांक : जानेवारी २९, २०२४

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकरिता आणि यांच्यावतीने

(सदस्य सचिव) (लेखा अधिकारी)

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

दि. ३१ मार्च, २०२३ या दिवशी संपलेल्या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे विवरण

(रक्कम रुपयात)

तपशील	सूची	३१.०३.२०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी	३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी
		रु.	रु.
उत्पन्न			
प्राप्त अनुदान	१०	३,६२,९३,०००	३,१३,०६,३३०
अन्य उत्पन्न	११	६,५१,६९०	८,९८,७९९
एकूण उत्पन्न		**३,६९,४४,६९०**	**३,२२,०५,१२९**
खर्च			
कर्मचारी लाभ खर्च	१२	२,१९,४७,७४२	२,०३,४७,४७५
प्रशासकीय खर्च	१३	२,९२,३७,३७०	२,२८,४२,१५२
कार्यक्रम खर्च	१४	२५,६६,४१५	१४,४९,४४१
घसारा	१५	७,२३,८६५	९,२७,४९१
एकूण खर्च		**५,४४,७५,३९२**	**४,५५,६६,५५९**
आधीच्या कालावधीच्या समायोजनापूर्वी उत्पन्नापेक्षा जास्त खर्च		**१,७५,३०,७०२**	**१,३३,६१,४३०**
गतकालीन खर्च / (उत्पन्न)	१६	२,५०,३२,६८४	१,००,०००
राखीव निधीला आणि अधिशेषाला अंतरित केलेली अधिक रक्कम / उणे रक्कम		**४,२५,६३,३८६**	**१,३४,६१,४३०**

वित्तीय विवरणाचा भाग असलेली महत्वपूर्ण लेखा धोरणे आणि टिप्पण्यां १ ते १९

आमचे समदिनांकाचे अहवालानुसार

करिता आर. ओ. पांडे आणि असोसिएटस

सनदी लेखापाल

एफआरएन – १३४४५५-डब्ल्यू

सी.ए. आर.ओ. पांडे

प्रोप्रायटर

सभासद क्र. १४८४३९

ठिकाण : मुंबई

दिनांक : जानेवारी २९, २०२४

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकरिता आणि यांच्यावतीने

(सदस्य सचिव)

(लेखा अधिकारी)

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

दि.३१ मार्च, २०२३ या दिवशी लेख्यांचा भाग असणारी टिप्पणी प्राप्ती व प्रदान खाते

खाते शीर्ष	३१.०३.२०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी	खाते शीर्ष	३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी
आरंभीच शिल्लक			
हातातील शिल्लक रक्कम	१०,१००		
बँकेतील शिल्लक	७,३२,८९८		
कार्य चालनातून प्राप्त राशी		चालू देयके	
प्राप्त वेतन अनुदान	३,०५,५६,०००	स्थापना खर्च	२,१९,४७,७४२
वेतन अनुदानाशिवाय अन्य प्राप्त	२,२२,७७,०००	प्रशासकीय खर्च	५,४२,७०,०५४
प्राप्त माहिती अधिकार शुल्क	-	कार्यक्रम खर्च	२५,६६,४१५
व्याज उत्पन्न	४,४८,६७५	महसूल अनुदान परतावा	१,६५,४०,०००
अन्य उत्पन्न	९६,२५०	शासनास अदा केलेले माहिती अधिकार शुल्क	-
		चालू नसलेली देयके	
कार्य चालनाखेरीज अन्य बाबींतून प्राप्त राशी		कर्जे आणि अग्रिमे	(६,४८,४१५)
चालू दायित्वे	२४,१०,२५४	इतर देयके (निर्दिष्ट करा)	(५६,७६५)
तरतुदी	३,९१,७४,३८५		
		अंतिम शिल्लक	
		हातातील शिल्लक रक्कम	३,०३५
		बँकेतील शिल्लक	१०,८३,२२६
एकूण रक्कम	**९,५७,०५,५६२**	**एकूण रक्कम**	**९,५७,०५,५६२**

आमचे समदिनांकाचे अहवालानुसार

करिता आर. ओ. पांडे आणि असोसिएटस
सनदी लेखापाल
एफआरएन – १३४४५५-डब्ल्यू

सी.ए. आर.ओ. पांडे
प्रोप्रायटर
सभासद क्र. १४८४३९
ठिकाण : मुंबई
दिनांक : जानेवारी २९, २०२४

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकरिता आणि यांच्यावतीने

(सदस्य सचिव) (लेखा अधिकारी)

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

टिप्पणी क्र. १ – सामान्य माहिती

महाराष्ट्र राज्य महिला आयोग (MSCW) १९९३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XV च्या नियम आणि तरतुदीनुसार २५ जानेवारी १९९३ रोजी अस्तित्वात आला. हा कायदा समाजातील महिलांचा दर्जा आणि प्रतिष्ठा सुधारण्यासाठी, स्त्रियांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या प्रथांचे अन्वेषण करण्यासाठी आणि त्याविरुद्ध योग्य उपाययोजना सूचवण्यासाठी, स्त्रियांना प्रभावित करणाऱ्या कायद्यांची प्रभावीपणे देखरेख करण्यासाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी आणि संबंधित किंवा प्रासंगिक बाबींमध्ये समाजातील स्त्रियांची स्थिती आणि प्रतिष्ठा सुधारणे आणि उन्नत करणे अशा संबंधित सर्व बाबींमध्ये सरकारला सल्ला देण्यासाठी प्रयत्न करतो.

आयोग ही एक वैधानिक संस्था आहे, आयोगास दिवाणी न्यायालयाला लागू असलेले अधिकार पुढील आहेत : कोणत्याही न्यायालय किंवा कार्यालयाकडून सार्वजनिक दस्तऐवजाची मागणी करणे, साक्षीदारांच्या तपासणीसाठी आणि आयोगासमोर कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आदेश जारी करणे, स्त्रियांशी संबंधित कोणत्याही प्रश्नाची तपशीलवार चौकशी करण्यासाठी राज्य किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

टिप्पणी क्र. २ – महत्त्वपूर्ण लेखा धोरणांचा सारांश

२.१ महत्वपूर्ण लेखा धोरण व वित्तीय विवरणे तयार करण्याचा पाया

आयोगाची वित्तीय विवरणपत्रे भारतातील सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्त्वांनुसार (भारतीय जीएएपी) तयार करण्यात आली आहेत. "भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने" जारी केलेल्या अनिवार्य लेखा मानकांनुसार अन्यथा नमूद केल्याशिवाय ऐतिहासिक परिव्यय पद्धतीनुसार वित्तीय विवरणपत्रे जमा आधारावर तयार केली गेली आहेत. जेथे नवीन जारी केलेले लेखा मानक सुरुवातीला स्वीकारले गेले आहे किंवा विद्यमान लेखामानकाच्या पुनरावृत्तीसाठी आतापर्यंत वापरात असलेल्या लेखाधोरणात बदल आवश्यक आहे. अशा बाबींखेरीज लेखा विषयक धोरणे सातत्याने लागू केली गेली आहेत.

२.२ अंदाजांचा उपयोग :

सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीनुसार वित्तीय लेखे तयार करण्यासाठी ताळेबंदाच्या दिवशीचा मालमत्ता व देयता (घटनासापेक्ष देयतांसह) व ताळेबंदाच्या वर्षी संपलेल्या वर्षामध्ये झालेल्या उत्पन्न व खर्चाच्या आकड्यांचा अंदाज करणे व त्यावर परिणाम होणाऱ्या गोष्टींची गृहितके ठरवणे व्यवस्थापनाला आवश्यक असते. प्रत्यक्ष निकाल व केलेले अंदाज यामधील फरक हे ज्या कालखंडामध्ये सदर निकाल घडतात किंवा समजून येतात त्या कालखंडामध्ये ओळखले जातात. अंदाज व प्रत्यक्ष रकमा यातील फरक ज्या वेळी समजून येतो / घडतो, त्या काळात ओळखला जातो.

२.३ महसूलाची ओळख

(अ) मुदत ठेवींवरील व्याज संचित आधारावर गणले जाते.

(ब) बँकेच्या बचत खात्यांवरील व्याज बँकेद्वारे जमा केले जाते तेव्हा ते गणले जाते.

(क) कर्मचाऱ्यांचे कर्मचारी गृह कर्जावरील व्याज शासन निर्णय क्रमांक एचबीए/इंटरेस्टरेट//१०१५/पीके-२२/२०१५ दिनांक ०१.०२.२०१८ नुसार लागू असलेल्या व्याज दराच्या आधारावर गणले जाते.

२.४ स्थिर मालमत्ता, घसारा आणि अमोर्टायझेशन

(अ) स्थिर मालमत्ता ही परिव्यय उणे संचित घसारा व मालमत्तेतील नुकसान (असल्यास) या किंमतीला दाखवली जाते. वास्तविक भांडवली खर्चामध्ये मालमत्तेची किंमत, माल वाहतूक, स्थापना खर्च, शुल्क आणि कर आणि निश्चित मालमत्ता वापरासाठी तयार होईपर्यंत इतर आनुषंगिक खर्च यांचा समावेश होतो.

(ब) दृश्य मालमत्तेवरील घसाऱ्याचा हिशेब कमी केलेली किंमत या तत्वावर केला आहे व त्यासाठी आयकर कायदा, १९६१ व त्या अंतर्गत केलेले नियम यांचा वापर केला आहे.

(क) विक्री केलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या स्थिर मालमत्तेची किंमत आणि संचित घसारा नमूद केलेल्या मूल्यांमधून काढून टाकला जातो आणि परिणामी नफा आणि तोटा उत्पन्न आणि खर्च खात्यात समाविष्ट केला जातो.

२.५ मालमत्तेची हानी

मालमत्ता (दृश्य किंवा अदृश्य) बिघडेल किंवा मालमत्तेची हानी होईल असे कोणतेही संकेत आहेत की नाही याचे मूल्यांकन प्रत्येक ताळेबंद तारखेला केले जाते. हानीचे मूल्यांकन करण्याच्या हेतूने, मालमत्तेचा जो सर्वात लहान ओळखण्या योग्य गट सतत वापरातून रोख प्रवाह निर्माण करतो, तसेच जो इतर मालमत्ता किंवा मालमत्तेच्या गटांमधून मोठ्या प्रमाणात रोख रकमेपासून स्वतंत्र असतो, तो रोख उत्पन्न करणारा एकक मानला जातो. असे कोणतेही संकेत अस्तित्त्वात असल्यास, मालमत्ता / रोख उत्पन्न करणाऱ्या घटकाच्या वसूल करण्यायोग्य रकमेचा अंदाज लावला जातो. ज्या मालमत्तेचे वहन मूल्य त्यांच्या वसूल करण्यायोग्य रकमेपेक्षा जास्त आहे त्यांच्यावर घसारा आकारुन ते मूल्य वसूल करण्यायोग्य रकमे इतके ठेवले जाते. वसूल करण्यायोग्य रक्कम मालमत्तेच्या किंवा रोख उत्पन्न करणाऱ्या घटकाच्या निव्वळ विक्री किंमत आणि वापरात असलेल्या मूल्यापेक्षा जास्त असते. वापरात असलेले मूल्य म्हणजे मालमत्तेच्या सतत वापरामुळे आणि त्याच्या उपयुक्त आयुष्याच्या शेवटी त्याची विल्हेवाट लावल्यामुळे अपेक्षित भविष्यातील अंदाजे रोख प्रवाहाचे वर्तमान मूल्य आहे. पूर्वीच्या लेखाकालावधीत मालमत्तेसाठी ओळखले जाणारे नुकसान आता अस्तित्वात नाही किंवा कमी झाले आहे असे कोणतेही संकेत आहेत की नाही याचे मूल्यांकन प्रत्येक ताळेबंद तारखेला केले जाते.

२.६ शासकीय अनुदान

व्यवस्थापकीय अनुदान

आयोगाला 'वेतन अनुदान' आणि 'वेतनेतर अनुदान' या स्वरूपात महाराष्ट्र राज्य शासनाकडून दैनंदिन प्रशासन खर्च भागवण्यासाठी व्यवस्थापकीय अनुदानाच्या स्वरुपात अनुदान मिळते. सदर अनुदाने महसूल स्वरूपातील आहेत आणि 'सरकारी अनुदानांच्या लेखा' वरील लेखा मानक (एएस) - १२ नुसार उत्पन्न आणि खर्च खात्यातील 'अन्य उत्पन्न' म्हणून मानले जातात.

२.७ कर्मचारी लाभ

रजेचे रोखीकरण

रजेच्या रोखीकरणाच्या दायित्वाची लेखा रोख आधारावर केली जाते. ही पद्धत लेखा मानक (एएस -१५) (सुधारित २००५) 'कर्मचारी लाभ अनुसार नाही' या लेखा मानकानुसार सदर लेखा 'कर्मचारी लाभ' म्हणून ॲक्चुरियल मूल्यमापनाच्या आधारे वंचित पद्धतीने करणे आवश्यक आहे.

२.८ तरतुदी, घटनासापेक्ष दायित्वे आणि घटनासापेक्ष मालमत्ता

अन्यथा नमूद केल्या शिवाय, भूतकाळातील घटनेचा परिणाम म्हणून वर्तमान दायित्वांसाठीच्या तरतुदी सामान्यतः आयोगाने लेखा तत्त्वांनुसार लेखा मानक २९ (एएस - २९) 'तरतुदी, घटनासापेक्ष दायित्वे आणि घटनासापेक्ष मालमत्ता' अंतर्गत दिलेल्या दायित्वाच्या रकमेच्या विश्वसनीय अंदाजाच्या आधारावर लेखा तत्त्वांनुसार केल्या जातात.

२.९ मागील काळाच्या बाबी / मद :

आधीच्या वर्षातील खर्चांचे प्रावधान न करणे, काही चुका व काही बाबी वगळणे इत्यादींमुळे केलेले समायोजनांचे लेखे "मागील काळाच्या बाबी / मद" या वेगळया लेखा शीर्षाखाली घेतल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ३ – राखीव व अधिशेष

तपशील	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
	रु.	रु.
दि. ३१ मार्च २०२२ रोजी आरंभीची शिल्लक	(१०,६८,४९,८८७)	(६,६९,७१,४५७)
अधिक : वर्षासाठी उत्पन्ना पेक्षा जास्त खर्च	(४,२५,६३,३८६)	(१,३४,६१,४३०)
अधिक : दि. ३१ मार्च २०२१ रोजी परत करण्या योग्य अखर्चित अनुदानाची ओळख	-	(२,६४,१७,०००)
दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजीची अखेरची शिल्लक	**(१४,९४,१३,२७२)**	**(१०,६८,४९,८८७)**

३.१ आयोगाने ३१.०३.२०२१ रोजी २६४.१७ लाख किंमतीच्या कालावधीच्या वस्तूचे अखर्चित अनुदान ओळखले आहे आणि ते २०२१-२०२२ या वर्षादरम्यान चालू दायित्वांमध्ये हस्तांतरित केले आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ४ - स्थिर मालमत्ता

(रक्कम रुपयात)

तपशील	दर	स्थूल गट				घसारा आणि अमोर्टायझेशन				निव्वळगट	
		०१.०४.२०२२ रोजी असलेली शिल्लक राशी	भर	वजा/ घट	३१.३.२०२३ रोजीअसलेली शिल्लक राशी	०१.०४.२०२२ रोजी असलेली शिल्लक राशी	वर्षभरासाठी घसारा आणि अमोर्टायझेशन खर्च	वजा/ घट	३१.०३.२०२३ रोजी असलेली शिल्लक राशी	३१.०३.२०२३ रोजी असलेली शिल्लक राशी	३१.०३.२०२२ रोजी असलेली शिल्लक राशी
दृश्य मत्ता (अ)		रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.
कार्यालय सामग्री	१५%	३४,२९,०३१	--	--	३४,२९,०३१	२१,८१,९६६	१,८७,०६०	--	२३,६९,०२६	१०,६०,००५	१२,४७,०६५
संगणक आणि छपाई यंत्र	४०%	३०,७३,२९७	--	--	३०,७३,२९७	२७,६५,६१३	१,२३,०७४	--	२८,८८,६८७	१,८४,६१०	३,०७,६८४
फर्निचर आणि फिक्श्चर्स	१०%	३७,८५,३००	--	--	३७,८५,३००	२५,७५,३०५	१,२०,९९९	--	२६,९६,३०४	१०,८८,९९६	१२,०९,९९५
मोटार गाडी	१५%	२१,७२,७३७	--	--	२१,७२,७३७	१२,३३,०९६	१,४०,९४६	--	१३,७४,०४२	७,९८,६९५	९,३९,६४१
ग्रंथालय पुस्तके	१०%	१,०२,०५५	--	--	१,०२,०५५	८६,४८८	१,५५७	--	८८,०४५	१४,०१०	१५,५६७
एकूण (अ)		**१,२५,६२,४२०**			**१,२५,६२,४२०**	**८८,४२,४६८**	**५,७३,६३६**	--	**९४,१६,१०४**	**३१,४६,३१६**	**३७,१९,९५२**
अदृश्य मत्ता (ब)											
सॉफ्टवेअर	२५%	२३,६९,८२१	--	--	२३,६९,८२१	१७,६८,९०४	१,५०,२२९	--	१९,१९,१३३	४,५०,६८८	६,००,९१७
एकूण (ब)		**२३,६९,८२१**			**२३,६९,८२१**	**१७,६८,९०४**	**१,५०,२२९**	--	**१९,१९,१३३**	**४,५०,६८८**	**६,००,९१७**
एकूण-(अ + ब)		**१,४९,३२,२४१**	**--**	**--**	**१,४९,३२,२४१**	**१,०६,११,३७२**	**७,२३,८६५**	**--**	**१,१३,३५,२३७**	**३५,९७,००४**	**४३,२०,८६९**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ५ - रोख व रोखसम

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
अ) हातातील शिल्लक रक्कम			
हातातील शिल्लक रक्कम		३,३०५	१०,१००
ब) बँकेतील शिल्लक			
बँक ऑफ महाराष्ट्र – अनुदान खाते		२,३६,८०७	१,९२,७४४
बँक ऑफ महाराष्ट्र - कर खाते		२,३६,२६५	६२,६०३
कॅनरा बँक – जीपीएफ खाते		६,१०,१५४	४,७७,५५१
एकूण		**१०,८६,५३१**	**७,४२,९९८**

टिप्पणी ६ – बाह्य संस्थेकडील ठेवी

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
विद्युत ठेव		२१,७३०	२१,७३०
दूरध्वनी ठेव		१,१३,०००	१,१३,०००
प्रदान केलेली सुरक्षा ठेव		५०,०००	-
एकूण		**१,८४,७३०**	**१,३४,७३०**

टिप्पणी ७ – कर्जे व अग्रिमे

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
कर्मचाऱ्यांना अग्रिम	७.१	४२,८८,०१४	१४,९१,९०३
सार्वजनिक बांधकाम विभागाला अग्रिम	७.२	२७,२९,६०९	६१,९७,११२
पूर्वदत्त खर्च	७.३	१,५४,५९७	१,३१,६२०
इतर अग्रिम	७.४	४७,९२३	४७,९२३
एकूण		**७२,२०,१४३**	**७८,६८,५५८**

७.१ "कर्मचाऱ्यांना अग्रिम" यामध्ये रु.३६,९६,९००/- या रकमेचा समावेश आहे. या रकमेमध्ये निर्धारित योगदान निवृत्ती वेतन (डीसीपीएस) या योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणारे योगदान याचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ८ – कर्जे व अग्रिमे

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
किरकोळ धनको	८.१	५३,५४१	४९६
सार्वजनिक बांधकाम विभागाला देय	८.२	४,१०,४०४	४,१०,४०४
संबंधित प्राधिकरणांना देय वेतन कपात	८.३	७६,०९,९५२	५२,३६,७९१
वैधानिक थकबाकी	८.४	३,६५,५६५	१,५६,२०१
प्राप्त सुरक्षा ठेवी	८.५	३०,१६४	११,५००
अन्य देय	८.६	-	२,४३,९८१
एकूण		**८४,६९,६२६**	**६०,५९,३७३**

टिप्पणी ९ – तरतुदी / प्रावधान

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
खर्चासाठी प्रावधान	९.१	१५,०७,१९,७५४	११,१५,४५,३६९
देय कार्यक्रम खर्च	९.२	२३,१२,३००	२३,१२,३००
एकूण		**१५,३०,३२,०५४**	**११,३८,५७,६६९**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ७.१ – कर्मचाऱ्यांना अग्रिमे

(रक्कम रुपयात)

तपशील	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
एस. एस. अरगेकर यांना गृह कर्ज	११,२६,२०९	१३,८२,९०३
कर्मचाऱ्यांना अग्रिम	११,०००	१६,५००
निर्धारित योगदान निवृत्ती वेतन (डीसीपीएस) यासाठी	३०,८०,८०५	-
सण अग्रिम	७०,०००	९२,५००
एकूण	**४२,८८,०१४**	**१४,९१,९०३**

टिप्पणी ७.२ – सार्वजनिक बांधकाम विभागाला अग्रिम

(रक्कम रुपयात)

तपशील	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
सार्वजनिक बांधकाम विभागाला अग्रिम	४,१६,५५०	४,१६,५५०
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुलुंड यांना अग्रिम	१,१२,३९८	१,१२,३९८
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना अग्रिम	८,५४,८८१	१०,९१,८१७
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत, नवी मुंबई यांना अग्रिम	६,१६,९१८	५,७६,३४७
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नवी मुंबई यांना अग्रिम	७,२८,८६२	४०,००,०००
एकूण	**२७,२९,६०९**	**६१,९७,११२**

टिप्पणी ७.३ – पूर्वदत्त खर्च

(रक्कम रुपयात)

तपशील	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
अध्यक्षांना वाहन विमा	९,८७१	१०,५७२
सदस्य सचिव यांना वाहन विमा	४,१३५	४,९०७
संकेतस्थळ देखभाल	१,४०,५९१	१,१६,१४१
एकूण	**१,५४,५९७**	**१,३१,६२०**

टिप्पणी ७.४ – अन्य अग्रिमे

(रक्कम रुपयात)

तपशील	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
यु.एच. कद्रेकर यांच्याकडून प्राप्त	४६,९२३	४६,९२३
आरबीआयला जास्तीचे प्रदान – भंगार रक्कम	१,०००	१,०००
एकूण	**४७,९२३**	**४७,९२३**

टिप्पणी ८.१ – किरकोळ कर्जदार

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
पॅरामाऊंट व्हिजन प्रा. लि.		१६,९१५	-
कॉपीर इंटरॲक्टीव्ह स्टिस्टम्स प्रा. लि. ठेव		४९७	४९६
आर्ची एंटरप्रायझेस		४	-
हेरंब कुलकर्णी		७,५६०	-
शीतल पेस्ट कंट्रोल		९,०६५	-
महाराष्ट्र राज्य महिला आयोग		१९,५००	-
एकूण		**५३,५४१**	**४९६**

टिप्पणी ८.२ – सार्वजनिक बांधकाम विभागाला देय

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
सार्वजनिक बांधकाम विभागाला देय – दुरुस्ती कार्य		२,४९,४०४	२,४९,४०४
सार्वजनिक बांधकाम विभागाला देय – विद्युत स्थापना		१,६१,०००	१,६१,०००
एकूण		**४,१०,४०४**	**४,१०,४०४**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ८.३ – संबंधित प्राधिकरणांना देय वेतन कपात

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
निर्धारित योगदान निवृत्ती वेतन प्रतिनियुक्ती – कर्मचाऱ्यांचे देय योगदान		२०,५४८	-
निर्धारित योगदान निवृत्ती वेतन प्रतिनियुक्ती – नियोक्त्याचे योगदान		२८,७६९	-
निर्धारित योगदान निवृत्ती वेतन प्रतिनियुक्ती – कर्मचाऱ्यांचे योगदान		६७,७७,७०५	४५,१७,९३७
..... (जीआयएस) योजना - कर्मचाऱ्यांचे देय योगदान प्रतिनियुक्ती		५,०४०	६,६००
..... (जीआयएस) योजना - कर्मचाऱ्यांचे देय योगदान		१,४४०	-
अपघात विमा योगदान		-	६,०१८
बचत कपात – तृतीय श्रेणी कर्मचारी		३०,०००	९४,६५०
बचत कपात – चतुर्थ श्रेणी कर्मचारी		६,२२,१५४	४,७७,५५१
देयक कपात ..... (एचबीए)		२९,४१२	४५,०३७
देयक कपात ..... (एचआरएससी)		१०,७३५	३,५००
देय भारतीय विमा हप्ता		३८,६१६	३६,३५९
देय मुद्रांक		३०	३३
वसुली योग्य बँक कर्ज		४५,५०३	४९,१०६
एकूण		**७६,०९,९५२**	**५२,३६,७९१**

टिप्पणी ८.४ – देय वैधानिक थकबाकी

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
देय आयकर उद्गम कर कपात		३,३८,३१२	१,३९,७२९
देय वस्तू व सेवाकर उद्गम कर कपात		२१,६५३	९,८७२
देय व्यवसाय कर		५,६००	६,६००
एकूण		**३,६५,५६५**	**१,५६,२०१**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी ८.५ – प्राप्त सुरक्षा ठेवी

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
कॉपीर इंटर ॲक्टीव्ह स्टिस्टम्स प्रा. लि. ठेव		१,५००	१,५००
पी. शर्मा अँड असोसिएट्स		१०,०००	१०,०००
हेल्पलाईन भारती		८,६६४	-
श्री आयटी सोल्युशन्स		१०,०००	-
एकूण		**३०,१६४**	**११,५००**

टिप्पणी ८.६ – देय वैधानिक थकबाकी

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
शासनाला परत करण्यायोग्य व्याजाची तरतूद		-	२,४३,९८१
शासनाला देय अन्य उत्पन्न		-	-
एकूण		**-**	**२,४३,९८१**

टिप्पणी ९.१ – खर्चासाठी तरतूद

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
कर्मचाऱ्यांना वेतन आणि पगार		१२,४२,४४५	१७,३०,८८०
देय भाडे		१४,८५,७०,०१९	१०,८९,३३,९५७
बाह्य यंत्रणा वेतनासाठी प्रावधान		१,८४,७५४	२,०३,४५१
देय दूरध्वनी खर्च		१५,६३९	१७,४३१
देय विद्युत शुल्क		२६,५९०	-
देय लेखा शुल्क		२,८६,२००	२,७३,६००
हेल्पलाईन खर्चासाठी प्रावधान		२३,६००	-
गृह व्यवस्थापन खर्चासाठी प्रावधान		२८,१७२	१२,०००
देय वैधानिक लेखापरीक्षण शुल्क		१,९३,२३५	२,००,०००
देय अंतर्गत लेखापरीक्षण शुल्क		१,४१,६००	१,२८,०३०
देय कर अनुपालन शुल्क		६,०००	४६,०२०
वृत्तपत्र देय खर्च		१५००	-
एकूण		**१५,०७,१९,७५४**	**११,१५,४५,३६९**

९.१.१ वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये आयोगाने "म्हाडाला देय भाडे" याची लेखा म्हाडाच्या मागणी पत्राप्रमाणे केली. आयोगाने संबंधित प्राधिकाऱ्यांकडे या मागणीविरुद्ध दाद मागितली आहे. तथापि, देय भाड्याबाबतची तरतूद "सावधनीती" (प्रूडन्स) या अधारे केली आहे.

टिप्पणी ९.२ – देय कार्यक्रम खर्च

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	३१.०३.२०२३ रोजी	३१.०३.२०२२ रोजी
साकार – संशोधन अनिवासी भारतीय ऑक्टोबर २०१८		२,७२,०००	२,७२,०००
तृतीयपंथी व्यक्तीवर राष्ट्रीय परिषद ०६.११.२०१९		५०,०००	५०,०००
स्नेहालय हेल्पलाईन कार्यक्रम ०१.०२.१९ ते ३०.०१.२०		३,५७,८००	३,५७,८००
संशोधन २०१९-२० देय		१६,३२,५००	१६,३२,५००
एकूण		**२३,१२,३००**	**२३,१२,३००**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी १० - प्राप्त झालेले अनुदान

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	दि.३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी	दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी
वेतन अनुदान		२,१४,२७,८७१	२,०३,४७,४७५
वेतनेत्तर अनुदान		१,४८,६५,१२९	१,०९,५८,८५५
एकूण		३,६२,९३,०००	३,१३,०६,३३०

१०.१ आयोगाला महाराष्ट्र राज्य शासनाकडून वेतन आणि वेतनेत्तर अनुदानाच्या स्वरूपात अनुदान मिळते. ते संचित आधारावर मोजले जाते.

१०.२ ज्या उद्देशासाठी हे प्राप्त झाले आहे त्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी केलेल्या खर्चाच्या मर्यादेपर्यंत महसूल अनुदान हे उत्पन्न म्हणून ओळखले जाते.

टिप्पणी ११–अन्य उत्पन्न

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	दि.३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी	दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी
बँकेच्या बचत खात्यावरील व्याज		४,४८,६७५	८,२२,९८७
कर्मचाऱ्यांच्या गृह कर्जावरील व्याज		९६,२५०	५९,३७५
खर्चाच्या तरतुदीचे पुनर्लेखन		१,०६,७६५	१६,४३७
एकूण		**६,५१,६९०**	**८,९८,७९९**

११.१ बचत बँक खात्यांवरील व्याज बँकेद्वारे जमा केले जाते तेव्हा ते गणले जाते.

११.२ कर्मचाऱ्यांचे कर्मचारी गृह कर्जावरील व्याज शासन निर्णय क्रमांक एचबीए/इंटरेस्टरेट/ १०१५/पीके-२२/२०१५, दिनांक ०१.०२.२०१८ नुसार लागू असलेल्या व्याज दराच्या आधारावर दिले जाते.

११.३ वर्षभरात, आयोगाने मागील आर्थिक वर्षात सेवानिवृत्ती लाभांसाठी केलेल्या अतिरिक्त तरतुदीचे पुनर्लेखन केले आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी क्र.१२ कर्मचारी लाभ खर्च

(रक्कम रुपयात)

तपशील	उप सूची	दि.३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी	दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी
कर्मचाऱ्यांना वेतन, मजुरी आणि भत्ते	१२.१	२,०६,५१,४७२	१,९६,४७,६६४
सदस्य-सचिव यांना भत्ते	१२.२	७८,९०६	८८,०००
अध्यक्ष, सदस्य व इतर यांना मानधन		२,५३,५००	४७,६११
वैद्यकीय खर्च		-	४,८००
निर्धारित योगदान निवृत्ती वेतन योजनेला (डीसीपीएसला) कर्मचाऱ्यांचे योगदान		९,६३,८६४	५,५९,४००
	एकूण	**२,१९,४७,७४२**	**२,०३,४७,४७५**

१२.१ महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने असा प्रस्ताव पाठवला आहे की, आयोगाच्या कर्मचाऱ्यांना दीर्घ मुदतीचे निवृत्ती वेतनाचे फायदे लागू करण्यासाठी मान्यता द्यावी.

१२.२ आयोगाने त्या त्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून "नवीन निवृत्ती वेतन योजनेचे" कर्मचाऱ्यांचे योगदान कापलेले नाही. (१ जनसंपर्क अधिकारी, ३ समुपदेशक, १ लिपीक व १ "ड" श्रेणीचा कर्मचारी) महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने असा प्रस्ताव पाठवला आहे की, आयोगाच्या कर्मचाऱ्यांना नवीन निवृत्ती वेतन योजना लागू करण्यास मान्यता द्यावी.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां

टिप्पणी क्र.१३ प्रशासकीय खर्च

